November - 2019 (3)

10रु. Rs.10 5 AUG 2019 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

जोडपत्र - " अ "

(नियम 3 पहा)

केंद्रशासनाचा माहितीचा अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळवण्यांच्या अर्जाचा नमुना

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 03 मा.अ.
दिनांक: 07/11/2019

प्रति,

**मा. माहिती अधिकारी,**

विधी विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका. भाईंदर

1. अर्जदाराचे नाव : **राजेश महादेव जाधव** (संपादक- मिशन जनकल्याण)
2. पत्ता : 204, रवि नमन 4, गौरव संकल्प फेज 2,
   जी.सी. क्लब जवळ, हाटकेश, मीरा रोड (पूर्व)
   ता. जि. ठाणे 401107
   मो. 9323276613.
3. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : श्री सय्यद करीम अहमद
   (एक) माहितीचा विषय : याला देण्यात आलेल्या दुरुस्ती बांधकामावर असलेल्या दाव्याची माहिती विषयी.
   (दोन) माहितीशी संबंधित कालावधी : 07/11/2019 पर्यंत.
   (तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : 1) मनपा/आबां/10825/2018-19 दि. 23/01/2019 रोजी दिलेल्या दुरुस्ती परवानगी च्या बांधकामावर विधी विभागाच्या आक्षेप किंवा दावा असल्याचे दस्तऐवजांची छायांकित प्रती मिळाव्यात.
   2) दुरुस्ती देण्यात आलेल्या बांधकामावर मनपाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली होती त्याचा अहवाल मिळावा.

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या साक्षांकित व सत्यप्रती सही शिक्यानिशी दयाव्यात.

शासकीय नियमानुसार होणारी फी मी देण्यास तयार आहे.

ठिकाण : भाईंदर

दिनांक : 07/11/2019

अर्जदाराची स्वाक्षरी,

(राजेश महादेव जाधव)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे – ४०१ १०१

जा.क्र. मनपा/साबां/ १०८२७/२०१८ – १९ दि. २५/०७/२०१९

<u>महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम २६५ अ (४) (५) (६)</u>

वाचले :- मा. आयुक्त यांचे कडील जा.क्र.मनपा/आयुक्त/३८ दि. १/०८/२०१३ रोजीचे कार्यालयीन आदेश.

प्रति,
श्री. सय्यद करीम अहमद (भोगवटाधारक)
सरोगी ॲव्हेन्यू को.ऑ.हौ.सो.लि. इमारती शेजारी
कनकीया रोड
मिरारोड (पूर्व)

विषयः- मिरारोड (पूर्व), कनकीया रोड सरोगी ॲव्हेन्यू को.ऑ.हौ.सो.लि. इमारती शेजारी शांप नं.५ ची बांधकाम अभियंत्याकडील बांधकाम सुस्थिती अहवालानूसार दुरूस्ती करणेबाबत...

संदर्भ :-१) श्री. राजेश टी म्हात्रे "बांधकाम अभियंता", यांचे कडील दि.२५/०४/२०१८ रोजीचे बांधकाम सुस्थितीती अहवाल. (तळ + १ मजला.)

२) श्री. सय्यद करीम अहमद यांचा दि.28/03/2018 रोजीचा अर्ज.

३) मा.श्री. संजय थेराडे, सभापती कार्यालय क्र. 04 मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा दि.18/04/2014 रोजीचे गाळयाचा मोबदला देणेबाबतचे पत्र.

४) मा. प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 04 यांचेकडील गाळा दुरुस्ती परवानगी देणेबाबतचा दि.13/04/2018 रोजीचा अहवाल.

५) श्री. सय्यद करीम अहमद यांचे दि.13/04/2018 रोजीने सादर केलेले हमीपत्र.

६) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पॅनलवरील श्री. राजेश टी. म्हात्रे यांचा दि.25/04/2018 रोजीचा संरचनात्मक तपासणी अहवाल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व), कनकीया रोड सरोगी ॲव्हेन्यू को.ऑ.हौ.सो.लि. इमारती शेजारी शांप नं.५ या इमारती/ गृहनिर्माण संस्थेस संरचनात्मक तपासणी करुन बांधकाम सुस्थितीती प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. श्री. राजेश टी म्हात्रे "बांधकाम अभियंता" यांनी बांधकाम सुस्थितीता तपासणी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानूसार इमारतीत खालील प्रमाणे दुरूस्ती कामे करण्याची आवश्यकता आहे.

इमारतीचा काही भाग दुरुस्ती करण्यासारखा असून सद्यास्थितीत इमारत रहाण्यास योग्य आहे. खालीलप्रमाणे इमारत ०६ महिन्यात दुरुस्त करण्यात यावी. जेणेकरुन इमारतीची स्ट्रक्चरल स्थिती मजबूत होईल.

१) गाळयाची आर.सी.सी. मेंबर्सची दुरुस्ती करण्यात यावी.

२) गाळयामधील आतील व बाहेरील प्लॅस्टर, लादया व रंगकाम तसेच स्टील वर्कसीची दुरुस्ती करण्यात यावी.

३) सदरील गाळा सी 2 - बी या वर्गामध्ये येत असल्याने स्ट्रक्चर दुरुस्तीबाबत काही आढळून येत नाही.

१५) सदरील इमारत "बांधकाम अभियंता" कडील अहवालानूसार दुरूस्ती करणे बंधनकारक राहील

१६) सदरील इमारतीत कोणत्याही प्रकारचे वाढीव व नविन बांधकाम करणेस सक्त मनाई आहे. असें केल्यास आपणावर पुढील योग्यति करवाई करण्यात येईल.

१७) सदरील इमारत दुरुस्ती करताना इमारतीचा भाग कोसळून जिवित वा विर्त्तिय हानी झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.

१८) सदरील परवानगी मा. प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.४ यांच्या दि.१३/०४/२०१८ रोजीच्या अहवालाच्या अनुशंगाने देण्यात येत आहे.

१९) सदरील गाळा रस्ता रुंदीकरणाच्या वेळी रस्त्यात बाधित झाल्यास सदरील गाळा आपण स्वतःहून तोडणे बंधनकारक राहील.

२०) इमारतीचा जागेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

२१) सदरील जागेवरील शासकीय / निमशासकीय परवानग्या घेणे ही आपली जबाबदारी राहील.

२२) सदरील परवानगी ही फक्त इमारतीची दुरूस्ती करणेबाबत आहे. इमारतीत कोणतेही नवीन बांधकाम करणेस सक्त मनाई आहे.

वरील अटीशर्तीचे उल्लघन केल्यास सदरील परवानगी रद्द केली जाईल याची नोंद घ्यावी. वरील अटीशर्तीचे पालन करण्याच्या अटीवर सदर इमारतीच्या दुरूस्ती कामास त्वरीत सुरूवात करावी.

(दिपक खांबित)
कार्यकारी अभियंता (साबां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**कार्यवाही साठी :-**
**मा. प्रभाग अधिकारी प्रभाग क्र. ०४**

सोबत सदर इमारत दुरूस्ती कामाचे अंदाजपत्रक जोडले असुन वरील अटीशर्ती, कामाचे स्वरूप अंदाजपत्रानुसारच काम होत आहे, या बाबत खात्री करावी व परवानगी मधील अटीशर्तीचा भंग केल्यास परवानगी रद्द समजुन पुढील कार्यवाही करावी ही विनंती.

PC3/UA/2018-19DN/-8

# मिरा भाईंदर महानगरपालिका

RIGHT TO INFORMATION

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०२ /२०१९-२०
दि. १४/११/२०१९

प्रति,

श्री. राजेश महादेव जाधव
२०४, रवि नमन ४, गौरव संकल्प फेज २,
जी. सी. सी. क्लब जवळ, हटकेश, मिरारोड (पु)
ता. जि. ठाणे ४०११०७

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** आपला दि. ०७/११/२०१९ (प्राप्त दि. ०७/११/२०१९) रोजीचा अर्ज.

**महोदय,**

आपण संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण श्री. सय्यद करीम अहमद यांना देण्यात आलेल्या दुरुस्ती बांधकामावर असलेल्या दाव्याची मुद्दा क्र. १ व २ नुसार माहिती अपेक्षिली आहे. तरी श्री. सय्यद करीम अहमद या नावाने विधी विभागातील संगणकिय आज्ञाप्रणालीमध्ये शोध घेतला असता दावा क्र. स्पे. सी. सुट. ६००/२००६ या दाव्याची नोंद आढळून आलेली आहे. आपणास खालील मुद्यांनुसार माहिती उपलब्ध करुन देत आहे.

**मुद्दा क्र. १ :-** दावा क्र. स्पे. सी. सुट. ६००/२००६ ची प्रत (एकुण २४ प्रती)

**मुद्दा क्र. २ :-** वादी यांनी सदरचा दावा मागे घेतल्यामुळे सदर बांधकामावर कारवाई करणेस विधी विभागाने दि. २८/४/२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ३ यांस कळविलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देत आहे. (एकुण १ प्रत) परंतु सदरचे बांधकाम निष्कासनाचा अहवाल विधी विभागाकडे उपलब्ध नाही. सदरच्या मुद्याकरीता आपला अर्ज विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग यांस वर्ग करण्यात आलेला आहे.

वरील एकुण २५ प्रतिंकरीता रु. २/- प्रमाणे रु. ५०/- चा विधी विभागाकडे भरणा करुन सदरची माहिती उपलब्ध करुन घेता येईल.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. सुनिल लहाने, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Vwadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

14/11/2019

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०२ /२०१९-२०
दि. १४/११/२०१९

प्रति,
मा. विभाग प्रमुख
अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय** :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.

**संदर्भ** :- अर्जदार श्री. राजेश जाधव यांचा दि. ०७/११/२०१९ रोजीचा अर्ज.

महोदय,

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये अर्जदार यांनी श्री. सय्यद करीम अहमद यांना देण्यात आलेल्या दुरुस्ती बांधकामावर असलेल्या दाव्याची मुद्दा क्र. १ व २ नुसार माहिती अपेक्षिली आहे. सदर अर्जातील मुद्दा क्र. २ आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे सदरचा अर्ज आपल्या विभागास वर्ग करीत आहे. तरी अर्जदार यांस आपल्या स्तरावर मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

Swadke
सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- राजेश महादेव जाधव.

पोच
१५/११/१९
लिपीक
अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका